**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २१४ । मंगळवार १९ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322


## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत सतरावर्षीय मुलीचा पुण्यात शोध

### कोतवाली पोलिसांची कामगिरी । आरोपीस अटक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अपहरण झालेल्या सतरावर्षीय अल्पवयीन मुलीचा कोतवाली पोलिसांनी ऑपरेशन मुस्कान अंतर्गत शोध घेत पुण्यातून आरोपीसह तिला ताब्यात घेतले.

कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील सतरावर्षीय मुलीचे दि.१८ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास संशयित आरोपी प्रदीप उर्फ व व्हन्या परशुराम इजगत (रा. रेल्वेस्टेशन बोहरी चाळ, नगर) याने अपहरण केल्याबाबत मुलीच्या पालकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.



बराच शोध घेऊनही हे दोघे मिळून येत नव्हते. मुलगी व आरोपी हे पुणे शहरात वानवडी पोलीस ठाणे हद्दीत असल्याची गोपनीय माहिती कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना मिळाली. त्यांनी पथक पुणे येथे रवाना केले.
वानवडी पोलिसांच्या मदतीने पथकाने सलग ३६ तास तांत्रिक विश्लेषण करून ■ पान ४ वर

## लोखंडी कोयता घेऊन फिरणारा ताब्यात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोखंडी कोयता घेऊन संशयितरित्या फिरणा–या आरोपीस कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दिनांक १८ मे रोजी कोतवालीच्या गुन्हे शोध पथकाचे पोसई प्रवीण पाटील व अंमलदार कोतवाली हद्दीत पेट्रोलिंग करत असताना त्यांना पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यानी कळविले की, क्लेरा ब्रूस हायस्कूल मैदान परिसरात एक इसम हा हातात कोयता घेऊन संशयितरित्या फिरत आहे, तुम्ही तेथे जाऊन कारवाई करा. त्यानुसार लगेच क्लेरा ब्रूस हायस्कूल मैदान येथे जाऊन खात्री केली असता मैदानावर लोखंडी धारदार कोयता घेऊन फिरणारा ओंकार अरुण थोरात (वय १८, रा. मोरया पार्क, बोल्हेगाव ता. नगर) हा आढळून आला. त्याच्याविरुध्द पोकॉ दत्तात्रय कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, गुन्हे शोध पथकातील पोसई प्रवीण पाटील, सफौ संतोष बनकर, पोहेकॉ बाळकृष्ण दौंड, पोहेकॉ विनोद बोरगे, पोहेकॉ राहुल शिंदे, पोहेकॉ साबीर शेख, पोहेकॉ विशाल दळवी, पोहेकॉ विजय ठोंबरे, पोकॉ दत्तात्रय कोतकर, पोकॉ शिरीष तरटे, पोकॉ अतुल काजळे, पोकॉ अमोल गाडे, पोकॉ दीपक रोहकले, पोकॉ सूरज कदम, पोकॉ सत्यम शिंदे, पोकॉ रमेश शिंदे, पोकॉ अतुल लाटे, पोकॉ सचिन लोळगे, पोकॉ संकेत धीवर, मपोकॉ पल्लवी रोहकले, पोकॉ राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ

## १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्व. अरुणकाका साहित्य नगरीची तयारी पूर्ण

### संमेलनात साहित्यिक व साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे – स्वागत अध्यक्ष सुरेश बनसोडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन स्व. अरुणकाका साहित्य नगरीचे उद्घाटन २३ मे रोजी सकाळी १० वा. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण व कृषी मंत्री दत्तात्रय विठ्ठल उर्फ दत्ता मामा भरणे यांच्या शुभहस्ते हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्रामभैय्या जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंतराव डांगे, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, १६ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष संपतदादा बारस्कर, १६ वे संमेलनाध्यक्ष डॉ. संजीवनीताई तडेगावकर, माजी संमेलनाध्यक्ष व माजी आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर व संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. संदीप सांगळे हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे व शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी यांनी दिली.

उद्घाटनापूर्वी महापुरुषांना अभिवादन करून शाहिरी जलसा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. यामध्ये शाहीर कल्याण काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, डॉ. शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, दिगंबर गोंधळी, हौसीनाथ बोर्डे व शब्दगंधची टीम सहभागी होणार आहे. दुपारी २ वाजता आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण या विषयावर निलिमाताई बंडेलु यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यामध्ये संगमनेर येथील सामाजिक कार्यकर्त्या निलीमा क्षत्रिय, मॅक्सवुमन मुंबईच्या संपादिका प्रियदर्शनी हिंगे सहभागी होणार आहेत.

दुपारी ३ ते ५ कवयित्री माधुरीताई मरकड यांच्या अध्यक्षतेखाली खुले काव्य संमेलन (कवी कट्टा) होणार असून यावेळी दंगलकार नितीन चंदनशिवे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, प्राचार्य चंद्रकांत भोसले, प्रा.शशिकांत शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दुपारी ५ वाजता '' बदलते ग्रामीण जीवन आणि ग्राम संस्कृती '' या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजय कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यामध्ये प्राचार्य डॉ.संजय नगरकर, लोकमतचे निवासी संपादक सुधीर लंके,साथी शिवाजी नाईकवाडी, प्रा.डॉ.गणेश मोहिते सहभागी होणार आहेत.

सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे चे कोषाध्यक्ष,गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या अध्यक्षतेखाली गझल काव्य संमेलन होणार असून यामध्ये माधव सावंत, हनुमंत येवले, संजय पठाडे, रज्जाक शेख ,साहेबराव घुले, सरिता कलडोणे, प्रशांत वाघ, विक्रम कांबळे, राम गायकवाड, बबन धुमाळ, इकबाल काकर, बाळासाहेब गिरी, अरुण कटारिया, धनंजय तांदळे, सुहास घुमरे, हुमायून आतार, अजय त्रिभुवन, कुणाल शिरोडे, राजू आठवले, अंजली दीक्षित सहभागी होणार आहेत.

रविवारी सकाळी ९/३० वा.कथा व काव्य लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रा.डॉ.संजय पाईकराव, संदीप रोहकले यांच्या हस्ते होणार असून प्राचार्य डॉ. अशोकराव ढगे,प्राचार्य बाळासाहेब सागडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय ■ पान ४ वर

## अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरात सुविधांचा बोजवारा

### उन्हात अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना त्रास – राजेंद्र चोपडा । मोजक्याच लोकांच्या फायद्याचे आर्थिक विषय सोडून नागरी सुविधांकडेही मनपा प्रशासनाने लक्ष द्यावे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका सध्या पाणी योजना सक्षमीकरण तसेच मोक्याच्या जागांवर व्यापारी संकुल उभारणीसाठी बँकाकडे कर्ज मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. यामागे नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्याचा हेतू असल्याचे सांगितले जाते. मात्र सध्या शहरात आहे त्याच सुविधांचा बोजवारा उडाला आहे. नालेगाव अमरधाम येथे असलेल्या विद्युत वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. साफसफाईचा अभाव, जागोजागी पडलेला कचऱ्याचा ढिग, उच्चांकी तापमान असलेल्या ऊन्हात सावलीची व्यवस्था नसणे अशा अनेक गैरसोयींमुळे नागरिकांची कुचंबणा होत आहे. महानगरपालिकेने मोठे प्रकल्प कर्ज घेऊन नाही तर सरकारकडून निधी मिळवून जरूर उभारावेत पण किमान अंत्यविधी होणाऱ्या जागेत पुरेशा सुविधा द्याव्यात अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.



अमरधाम येथील विद्युत् वाहिनीवरील असुविधेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे की, नागरिकांची गरज ओळखून मुलतानचंदजी बोरा ट्रस्टने अमरधाम येथे विद्युत दाहिनीची व्यवस्था करून दिली. याठिकाणी स्व. मुलतानचंदजी बोरा (परदेशी गल्ली) यांचा अर्धपुतळाही बसवण्यात आला. विद्युत दाहिनीमुळे अंत्यसंस्कारांची एक चांगली व्यवस्था झाली. परंतु मागील काही काळापासून महानगरपालिकेला विद्युत वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीचा पूर्ण विसर पडला आहे. स्व. बोरा यांच्या पुतळ्या भोवतीची काच धुळीने पूर्ण काळवंडलेली आहे. त्यांचे नावही काळेकुट्ट पडले आहे. या पुतळा परिसरात घाणीचे साम्राज्य वाढले आहे. शहरातील अन्य मोठ्या व्यक्तिमत्वांच्या पुतळा परिसराचीही अशीच दुरवस्था झालेली आहे.

विद्युत दाहिनीत व्हेंटिलेशनची व्यवस्था नाही. येथील पंखे शॉर्ट सर्किट झाल्याने अनेक महिन्यांपासून बंद आहेत. अंत्यसंस्कारांसाठी आलेल्यांना अक्षरशः गुदमरल्यासारखे होते. बाहेर थांबायचे तर बसायला स्वच्छ जागा नाही. कडक उन्हात तिष्ठत उभे राहावे लागते. तत्कालीन नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात लावलेल्या झाडांची सावलीच काही प्रमाणात दिलासा देते. याठिकाणी महापालिकेकडून केवळ एकच कर्मचारी नियुक्त आहे. विद्युत दाहिनीचे सर्व संचालन हा एकच कर्मचारी करतो. त्यालाही साफसफाई व इतर सुविधा देताना अडचणी येतात. आज मनपाचे अनेक अधिकारी, पदाधिकारी यांच्या दिमतीला मनपाचे अनेक कर्मचारी नियुक्त आहेत. मात्र विद्युत दाहिनीत पुरेशा सुविधा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक कर्मचारी नेमण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. विद्युत दाहिनीच्या देखरेखीसाठी नियुक्त भंडारी नामक व्यक्ती नेमकं काय काम करते याचीही चौकशी झाली पाहिजे.

बोरा ट्रस्टचे अध्यक्ष अभय फिरोदिया हे मोठे उद्योजक असून ते पुण्यात स्थायिक आहेत. त्यांना येथील समस्यांची माहिती नाही. ट्रस्टचे नगरमधील कामकाज पाहण्यासाठी नियुक्त भंडारी या व्यक्तीचेही

विद्युत दाहिनीच्या परिसरातील समस्यांकडे दुर्लक्षच झाले आहे. मनपाला विद्युत दाहिनी उभारून देत ट्रस्टने समाजासाठी चांगले काम केले. एवढे असूनही महानगरपालिकेला याठिकाणी साध्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात अपयश येत आहे. नगरकर सहनशील आहेत म्हणून मनपा प्रशासन मनमानी करत आहे. शहराच्या महापौर, उपमहापौरांनी कामकाज सुरू करताना शहराचा भरीव विकास करण्याची ग्वाही दिली. त्यांनीच या अतिशय संवेदनशील विषयात लक्ष घालून अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरातील समस्यांची प्राधान्याने सोडवणूक करण्यासाठी प्रशासनाला आदेश दिले पाहिजेत. अमरधाम येथे नागरिकांना गैरसोयी सहन कराव्या लागत असताना महापालिकेने ■ पान ४ वर

## मनपा घनकचरा विभागातील अनागोंदी कारभार थांबवा; अन्यथा २२ मे रोजी बेमुदत धरणे आंदोलन

### अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनची आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी
### सफाई कर्मचाऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही – जितेंद्र सारसर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात सुरू असलेल्या मनमानी आणि अनागोंदी कारभाराविरोधात आता सफाई कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. विभाग प्रमुखांकडून सफाई कामगारांच्या मनमानी बदल्या केल्या जात असून कामगारांवर अन्यायकारक पद्धतीने अतिरिक्त कामाचा बोजा टाकला जात असल्याचा आरोप करत अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत निर्णय न घेतल्यास शुक्रवार दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून महापालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर सफाई, चेंबर व गटार कामगारांचे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला आहे.

कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर आणि सचिव आनंद वायकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घरकचरा व्यवस्थापन विभागामध्ये सुमारे ८०० सफाई कामगारांची संख्या असली तरी प्रत्यक्षात फक्त ६५० च्या आसपास कामगार कार्यरत आहेत. उर्वरित कामगार इतर विभागांमध्ये विविध आदेशान्वये कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत उपनगरांमध्ये कामगारांची संख्या अपुरी असल्याचे कारण देत विभाग



प्रमुखांकडून मनमानी पद्धतीने कामगारांच्या बदल्या केल्या जात आहेत. गरज नसताना कामगारांना एका भागातून दुसऱ्या भागात तोंडी आदेशाने पाठविले जात असल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, आधीच अपुऱ्या मनुष्यबळातून काम करणे सफाई कर्मचाऱ्यांना अत्यंत कठीण जात आहे. काही कामगार रजेवर, आठवड्याच्या सुट्टीवर किंवा इतर कारणांनी गैरहजर असतात. त्यामुळे त्यांच्या हद्दीतील कामे देखील उर्वरित कामगारांकडून करून घेतली जातात. त्याचबरोबर स्वच्छता अभियानासाठी प्रत्येक हजेरीवर किमान पाच कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामासाठी बोलावले जाते. परिणामी एका कामगाराकडून दोन–दोन हद्दींची कामे करून घेतली जात आहेत.

कामगार संघटनेने निवेदनात नमूद केले आहे की, सफाई कामगार कोणतीही तक्रार न करता प्रामाणिकपणे काम करत आहेत. ४० अंशांपेक्षा अधिक तापमानामध्ये देखील कामगार ईमानेइतबारे सेवा बजावत आहेत. अनेक कर्मचाऱ्यांचे पगार अद्याप झालेले नसतानाही ते सर्व अडचणींना सामोरे जात काम करत आहेत. मात्र विभाग प्रमुखांकडून कामगारांना स्वतःच्या नोकरांप्रमाणे वागणूक दिली जात असून त्यांच्याशी अरेरावीची भाषा वापरली जाते. कामगार काम करत नाहीत, असे खोटे आरोप देखील केले जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

निवेदनात असेही म्हटले आहे की, ''जर सफाई कामगारांनी कामे केली नाहीत तर शहरातील नागरिकांना रस्त्यावरून चालणे देखील कठीण होईल. तरीही कामगारांशी अन्यायकारक वागणूक केली जात आहे. शहरातील कामगारांना सावेडी, सावेडीतील कामगारांना केडगाव, तर केडगावमधील कामगारांना बुरुडगाव येथे तोंडी आदेशाने बदल्या केल्या जात आहेत. या बदल्या आकसापोटी केल्या जात असल्याची भावना कामगारांमध्ये निर्माण झाली आहे.

यापूर्वी घनकचरा व्यवस्थापन विभागात सफाई कामगार, चेंबर कामगार आणि गटार कामगार स्वतंत्रपणे आपापल्या हद्दीत काम करत होते. त्याच पद्धतीने कामकाज सुरू ■ पान ४ वर

## देशावर आर्थिक संकटाचा राहुल गांधींनी दिला इशारा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था –** पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्यांच्या खिशावर ताण वाढत असताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. देश लवकरच मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करणार असून त्याचा सर्वाधिक फटका



युवक, शेतकरी, कामगार आणि लघुउद्योजकांना बसेल, असा इशारा त्यांनी दिला.

रायबरेली दौऱ्यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, देशातील सध्याची आर्थिक व्यवस्था काही मोजक्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी तयार करण्यात आली आहे. ही व्यवस्था जास्त काळ टिकणार नाही आणि लवकरच देशाला मोठा आर्थिक धक्का बसू शकतो. जो आर्थिक झटका बसणार आहे त्याचा परिणाम उद्योगपतींवर होणार नाही, तर सामान्य नागरिकांवर होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नॉर्वे दौऱ्याचा उल्लेख करत राहुल गांधी यांनी सरकारवर टीका केली. सरकार लोकांना परदेश प्रवास कमी करण्याचा सल्ला देत आहे, मात्र पंतप्रधान स्वतः सातत्याने परदेश दौरे करत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

## दै. आकर्षण निवडक

### सूर्यनगरला हरिहरेश्वर मंदिरात रामायणाचार्य हभप घुगे महाराजांच्या राम कथेस प्रारंभ



अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर रोडवरील सूर्यनगर येथील हरिहरेश्वर मंदिरात हभप श्री रामायणाचार्य श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी देवाची) यांच्या रसाळ वाणीतून श्री रामायण कथा ज्ञानयज्ञ कथेचे आयोजन करण्यात आले असून त्याचा शुभारंभ दीप प्रज्वलनाने करण्यात आला. याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, नगरसेवक निखिल वारे, आकाश त्र्यंबके तसेच सूर्यनगर परिसरातील नागरिक उपस्थित होते.

सूर्यनगर परिसरातील सर्व नागरिक या सप्ताहाचे संयोजक असून श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. रोज सायंकाळी ५:३० ते ८:३० असे ३ तास संगीतमय रामकथेचे निरूपण हभप घुगे महाराज करीत आहेत. दररोज सकाळी ९ ते दुपारी १ पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण हभप खंडेराव मगर यांच्या रसाळ वाणीतून होत आहे. दिनांक १५ मे ते २१ मे पर्यंत रामकथेतील दैनिक उत्सवामध्ये मंगलाचरण, वंदना प्रकरण, शिवपार्वती विवाह कथा, श्रीराम जन्मोत्सव, बाललीला, विश्वमित्र राम संवाद, अहिल्या उद्धार व धनुष्यबाण कथा, सीता स्वयंवर, वनगमन कथा, चित्रकूट निवास, श्रीराम भरत भेट - संवाद, सीता हरण, शाबरी कथा, सीता शोध, लंका दहन,सेतुबंध,राम रावण युद्ध, रामराज्याभिषेक असे कार्यक्रम होणार आहेत. श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता गुरुवार दिनांक २१ मे रोजी सायंकाळी ७ ते ९ हभप श्रीनिवास महाराज घुगे यांचे काल्याचे किर्तनाने होणार असून नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्यामराव बुधवंत यांनी केले आहे. या कथेसाठी सिंध वादक कृष्णा महाराज व्यवहारे, तबलावादक पृथ्वीराज देशमुख, ताकभाते सर, तर हार्मोनियम सहगायक अजित गाडेकर, गणेश महाराज गायकवाड,सनई वादक राजेंद्र साळुंखे यांचे सहकार्य लाभत आहे.

### आनंदऋषीजी नेत्रालयास स्व.लक्ष्मीकांत शेटीया यांचे स्मरणार्थ ‘मोबाईल ॲम्बुलन्स व्हॅन’चे लोकार्पण



अहिल्यानगर-धावपळीच्या युगात महागडे औषध व तपासणीचा खर्च परवडत नसल्यामुळे अनेक वृद्ध व्यक्ती उपचारापासून वंचित राहतात. रुग्णा सेवा ही समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचावी.तसेच पैशाअभावी कोणत्याही व्यक्ती ला अंधत्व येऊ नये.म्हणून आनंदऋषीजी नेत्रालय बीड,संभाजीनगर ,मराठवाडा या भागात तसेच ग्रामीण भागात खेडोपाड्यात जाऊन तेथील रुग्णांचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करीत आहेत. आनंदऋषीजी नेत्रालयाचे कार्य सर्व दूर पसरले आहे.अंधाचे जीवन प्रकाशमान करून त्यांना नवी दृष्टी देण्याचे कार्य नेत्रालय मार्फत होत आहे.आनंदऋषीजी नेत्रालयाचे दृष्टी देण्याचे कार्य नेत्रदीपक आहे.असे प्रतिपादन सीए प्रणेश शेटीया यांनी केले आहे.आनंदऋषीजी नेत्रालयास स्व.लक्ष्मीकांत मिश्रीलाल शेटीया यांच्या स्मरणार्थ शेटीया परीवाराच्यावतीने ‘‘मोबाईल ॲम्बुलन्स व्हॅन‘‘ चा लोकार्पण सोहळा पार पडला.याप्रसंगी श्रीमती सीमा शेटीया,सीए प्रणेश शेटीया,सीए सौ.सलोनी शेटीया,कु.प्रतीक्षा शेटीया व शेटीया,अजित शेटीया,अभय शेटीया,मनीष शेटीया,दीपक शेटीया,महावीर शेटीया,सिद्धार्थ शेटीया,सुहित शेटीया,निलेश छाजेड,सौ.सारिका छाजेड, सौ.सारिका पारख,गणेश कांकरिया,गौतम चोरडिया, राजेंद्र तातेड,धन्यकुमार बरमेचा,अमोद बोथरा व मित्र परीवार,जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा,डॉ.प्रकाश कांकरिया,डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया,सतीश लोढा,वसंत चोपडा,डॉ.आशिष भंडारी,सुभाष मुनोत,प्रकाश छल्लाणी,नेत्रालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ.आनंद छाजेड आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वतीने गेल्या सात वर्षात १ लाख २५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात आले

# ठाकरे शिवसेनेच्या वतीने अहिल्यानगर शहरातील नीट विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाईन

## आत्महत्या नको, धैर्याने पुढे चला – किरण काळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पेपर फुटी नंतर नीट- यूजी २०२६ परीक्षेच्या रद्दबातल निर्णयामुळे देशासह अहिल्यानगर शहरातील विद्यार्थी आणि पालक मोठ्या मानसिक तणावाखाली आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे यांनी शहरातील विद्यार्थ्यांना धीर देत आत्महत्या किंवा नकारात्मक विचार न करण्याचे भावनिक आवाहन केले आहे.

अहिल्यानगर शहरातील विद्यार्थी व पालकांच्या समुपदेशनासाठी ठाकरे शिवसेनेच्या वतीने ९०६७९९९९०१ हा हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. तणावग्रस्त विद्यार्थी आणि पालकांनी कोणत्याही वेळी संपर्क साधावा. पालकांनी मुलांशी सकारात्मक संवाद साधावा. त्यांना भावनिक आधार द्यावा आणि त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही किरण काळे यांनी केले.

**चार विद्यार्थी आत्महत्या वेदनादायी :**

नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर गोवा, राजस्थान, दिल्ली आणि उत्तर प्रदेश येथे किमान चार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची दुःखद प्रकरणे समोर आली आहेत. त्या अत्यंत वेदनादायी आहेत. त्या पार्श्वभूमीवर किरण काळे यांच्या संकल्पनेतून ठाकरे शिवसेनेने हेल्पलाइनचा सकारात्मक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सरकारने योग्य ती खबरदारी घ्यावी. अशा प्रसंगात विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने पुढे येण्याची गरज असल्याचे काळे यांनी नमूद केले.



**धैर्य ठेवा, स्वतःवर विश्वास ठेवा :**

‘‘एक परीक्षा आयुष्या पेक्षा मोठी नाही. दोन–तीन वर्षांची मेहनत कधीच वाया जात नाही. अपयश, अन्याय किंवा अनिश्चितता आली तरी जीवन संपविण्याचा विचार करू नका. धैर्य ठेवा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि नव्या उमेदीने पुढे जा,’’ असे आवाहन विद्यार्थ्यांना काळे यांनी केले आहे.

काळे म्हणाले की, लाखो विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा दिली. विद्यार्थ्यांची दोन वर्षांची मेहनत पाण्यात गेली, पेपर फुटी, यंत्रणेच्या चुकीची शिक्षा विद्यार्थी, पालकांना का?, सरकार त्यांच्या भविष्या सोबत का खेळत आहे ? सरकारच्या गलथान व भ्रष्ट कारभारामुळे पालकांवर मोठा आर्थिक भार पडला आहे.

**पारदर्शक परीक्षा व्यवस्था उभारा :**

पेपर फुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे केंद्र सरकार आणि एनटीए वर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दोषींवर कठोर कारवाई, एनटीए मध्ये व्यापक सुधारणा, सुरक्षित व पारदर्शक परीक्षा व्यवस्था, तसेच विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावर मोफत समुपदेशन सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने किरण काळे यांनी केली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन

### दिल्ली गेट ते छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यापर्यंत निघणाऱ्या शोभायात्रेत २९ मे रोजी स्पर्धकांचा सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मा. पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत दिनांक २९ मे रोजी भव्य पारंपरिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या विविध महान व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषेत स्पर्धक सहभागी होणार असून शहरात पारंपरिक संस्कृतीचा अनोखा उत्सव रंगणार आहे.

ही स्पर्धा दोन गटांमध्ये आयोजित करण्यात आली असून शालेय वयोगट (इयत्ता दहावीपर्यंत) तसेच खुला गट अशा स्वरूपात स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, डॉ. आनंदीबाई जोशी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मुक्ताबाई, कान्होपात्रा, जनाबाई, बहिणाबाई, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, मल्हारराव होळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस आदी महान व्यक्तिमत्त्वांचे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

स्पर्धकांनी दिल्ली गेट येथून प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यापर्यंत निघणाऱ्या भव्य शोभायात्रेमध्ये सहभागी व्हायचे असून पारंपरिक वेशभूषा, ऐतिहासिक सादरीकरण आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविण्यात येणार आहे. या शोभायात्रेमुळे शहरात ऐतिहासिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण होणार असून नागरिकांना महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेची अनुभूती मिळणार आहे.

मा. पालकमंत्री महोत्सव समितीच्या वतीने सांगण्यात आले की, स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि युवकांमध्ये इतिहास, संस्कृती व महान व्यक्तिमत्त्वांविषयी अभिमान निर्माण करण्याचा उद्देश आहे. पारंपरिक वेशभूषेद्वारे समाजप्रबोधन घडवून आणत सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.अधिक माहितीसाठी स्पर्धकांनी ९४२२२२१५३२, ८८३०१५९०८३, ९८९०२६९६९८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मा. पालकमंत्री महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# देवस्थान जमिनींसाठी नवा कुळकायदा

शासनाने नुकतेच महाराष्ट्र देवस्थान ईनाम निर्मूलन प्रारुप अधिनियम, २०२६ नुसार देवस्थानांच्या ज्या जमिनी आणि स्थावर मिळकती आहेत, त्या, त्यातील कुळांना व भाडेकाऱ्याना या मिळकती मालकी हक्काने त्यांच्या नावाने करून देण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार असा कायदा झाला तर कुळांच्या ताब्यातील मिळकतींवर संबंधित देवस्थानांचा अथवा मठांचा मालकी हक्क संपुष्टात येणार आहे.

या कायद्यानुसार मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार शिघ्रगणकातील ( ) मूल्यांकन तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे देवस्थान मिळकतींचे धारणा मूल्य (खरेदी किंमत) ठरवण्याचे अधिकार जिल्हाधिकार्यांना अथवा त्यांचे तर्फे प्राधिकृत अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. एक जानेवारी २०११ पूर्वी जे अधिकृत कब्जेदार, कुळ, मिरासदार त्या देवस्थान मिळकतींमध्ये नोंद होते त्यांना धारणा मूल्याचा भरणा केल्यावर अशी जमीन या कुळांना पूर्ण मालकी हक्काने देण्यात येणार आहे.

प्रस्तावित कायद्यामध्ये अशीही तरतूद आहे की जर कोणी अनाधिकाराने देवस्थान मिळकतींचा कब्जा केला असेल त्याच्याकडून जिल्हाधिकारी ती मिळकत कागदोपत्री जप्त करणार. पण त्याने खरेदी मूल्य भरले तर ती मिळकत बेकायदेशीर कब्जेदाराचे नावाने मालकी हक्काने करून देण्यात येईल. सदर तरतुदी देवस्थानच्या मालकीच्या शहरातील अथवा रहिवासी भागात बांधकाम केलेल्या इमारतीमधील भाडेकऱ्यांना सुद्धा लागू होणार असल्याने भाडेकरूंच्या ताब्यातील घरे अथवा दुकाने त्यांना मालकी हक्काने देण्याचे प्रस्तावित आहे.

इनाम हक्क निर्मूलन अधिनियमांतर्गत कोणतेही कायदेशीर मुद्दे उपस्थित झाले तर दिवाणी न्यायालयाकडे अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागता येणार नाही. त्यामुळे या प्रस्तावित कायद्यानुसार फक्त जिल्हाधिकारी अथवा त्यांचे तर्फे प्राधिकृत अधिकाऱ्यांना या बाबत पूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार मिळणार आहेत.सदर प्रारुप अधिनियमाबाबत संपूर्ण राज्यातील सर्व देवस्थानच्या वतीने कोणत्याही सूचना व हरकती असल्यास त्या संबंधित विभागीय आयुक्त कायालया कडे पाच जून २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत सादर करता येतील.सुमारे ७० वर्षांपूर्वी खाजगी मालकीच्या जमिनी कुळांना मालकी हक्काने देण्यासाठी मुंबई कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ नुसार एक एप्रिल १९५७ हा कृषी दिन मानून त्या दिवसापासून कसले त्याची जमीन या तत्त्वानुसार जमिनीतील कुळांना नियंत्रित सत्ता प्रकाराने मालकी हक्क देण्यात आले होते. तसाच प्रकार आता देवस्थान जमिनींबाबत होणे प्रस्तावित आहे आहे. मात्र यावेळी पूर्ण हक्काने कुळांना व भाडेकऱ्यांना मालकी देण्यात येणार आहे.

**ॲड. शिवराज प्र. कदम जहागिरदार**
माजी अध्यक्ष, पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टीशनर्स असोसिएशन, पुणे

# युवकांनी सामाजिक कामाच्या माध्यमातून नावलौकिक वाढवावा - आमदार संग्राम जगताप

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते. आपण ज्या भागात राहतो त्या भागातील नागरिकांचे छोटे–मोठे प्रश्न हाती घेऊन ते सोडविण्यासाठी काम केले पाहिजे. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांचा विश्वास संपादन करणे हेच खरे कार्यकर्त्याचे वैशिष्ट्य असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांची निवड झाली असून त्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून पदाचा नावलौकिक वाढवावा, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांना निवडीचे पत्र प्रदान करताना आमदार संग्राम जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, युवक शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, वैभव ढाकणे, नितीन घोडके, दीपक खेडकर, मयूर बलदोटा, जगु शिंदे, रोहन रासकर, बाबासाहेब हराळ आदींसह युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, युवकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जोपासत समाजहिताचे काम करणे गरजेचे आहे. आजचा युवक मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनतेकडे आकर्षित होत असून त्यांना या प्रवृत्तींपासून दूर ठेवण्यासाठी समाजप्रबोधनाची आवश्यकता आहे. युवकांनी पुढाकार घेत चांगली पिढी घडविण्यासाठी काम करावे. ऋषिकेश रासकर यांनी युवकांचे प्रश्न सोडविण्याबरोबरच पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवावेत. तसेच आमदार संग्राम जगताप यांनी हाती घेतलेल्या हिंदू रक्षणाच्या कामामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे ते म्हणाले.

युवक शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आहे. युवकांमध्ये संघटन वाढवून पक्ष बळकट करण्यासाठी ते निश्चितच चांगले काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवनियुक्त युवक कार्याध्यक्ष ऋषिकेश रासकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून युवक कार्याध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे. त्या विश्वासाला पात्र राहून समाजकार्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील. आमदार संग्राम जगताप यांचे हिंदुत्ववादी विचार युवकांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करणार असून केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना युवकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. युवकांचे प्रश्न सोडवून संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात

## छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अभिवादन; साहित्य, सामाजिक कार्य आणि समाजप्रबोधनाचा जागर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात आणि वैचारिक वातावरणात पार पडले. ग्रामीण भागातील साहित्य, संस्कृती, लोकपरंपरा आणि समाजप्रबोधनाचा जागर घडविणाऱ्या या संमेलनात राज्यभरातील साहित्यिक, कवी, शाहिर, समाजप्रबोधक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हे साहित्य संमेलन स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि श्री नवनाथ युवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. ग्रामीण भागातील ज्येष्ठ आणि नवोदित साहित्यिक, कवी, शाहिर, कथाकथनकार यांच्या विचारांची समृद्ध मैफल या संमेलनात रंगली. साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन, संस्कार, सामाजिक ऐक्य आणि सकारात्मकतेचा संदेश देत या संमेलनाने ग्रामीण भागात वैचारिक चळवळीचा जागर घडविला.

शाहिरी पोवाडे, काव्यवाचन, सामाजिक आशयाची गीते आणि विविध सादरीकरणांमधून ‘‘मुलगी वाचवा, मुलगी शिकवा’’, सार्वजनिक स्वच्छता, सामाजिक जबाबदारी, इतिहास जागर आणि समाजातील विविध प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात आले. ग्रामीण संस्कृती आणि साहित्य परंपरेचा सुरेख संगम या संमेलनात अनुभवायला मिळाला.

संमेलनाचे उद्घाटन अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे आणि वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक तथा राष्ट्रपती पोलीस पदक विजेते रतीलाल चौधर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा तथा साहित्यिक प्रतिभा खैरनार, युवा किर्तनकार ह.भ.प. दिपाली गणगे–कोकाटे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत चाबुकस्वार, माजी सरपंच साहेबराव बोडखे, डॉ. विजय जाधव, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, उद्योजक दिलावर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

## सोनी गिफ्ट्समध्ये बर्गनर एक्सकॅलिबर एनामेल कोटेड कास्ट आयर्न सिरीजचे आकर्षक लॉन्च




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बदलत्या काळानुसार आता किचनचाही चेहरामोहरा बदलत असून स्वयंपाकात केवळ चवच नव्हे तर स्टाईललाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पारंपरिक काळ्या भांड्यांना आता निरोप देत आकर्षक डिझाईन, उत्कृष्ट गुणवत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाने सजलेली बर्गनर एक्सकॅलिबर एनामेल कोटेड कास्ट आयर्न सिरीज अहिल्यानगरमध्ये दाखल झाली आहे. ही प्रीमियम कुकवेअर सिरीज आता शहरातील सोनी गिफ्ट्स येथे ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

आधुनिक गृहिणी, शेफ तसेच किचनला प्रीमियम आणि एलिगंट लुक देण्याची इच्छा असणाऱ्या ग्राहकांसाठी ही सिरीज विशेष आकर्षण ठरत आहे. मजबूत कास्ट आयर्न बॉडीमुळे अन्न शिजताना उष्णतेचे समान वितरण होत असून प्रत्येक पदार्थाला रेस्टॉरंट स्टाईल चव मिळण्यास मदत होते. त्यामुळे स्वयंपाक अधिक हेल्दी, स्वादिष्ट आणि आकर्षक बनत असल्याचे सांगण्यात आले.या सिरीजमध्ये आधुनिक डिझाईन, टिकाऊपणा आणि उत्कृष्ट परफॉर्मन्सचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो. ‘‘फॅशन फॉर युवर किचन’’ या संकल्पनेवर आधारित असलेल्या बर्गनर एक्सकॅलिबर सिरीजमुळे किचनला प्रीमियम आणि स्टायलिश लुक मिळत आहे. आधुनिक जीवनशैलीला साजेशी ही कुकवेअर रेंज ग्राहकांच्या पसंतीस उतरत असून गृहसजावटीसोबतच स्मार्ट कुकिंगसाठीही उपयुक्त ठरत आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार



अहिल्यानगर- आज स्पर्धेचे युग असल्याने विद्यार्थ्यांनी त्याप्रमाणे नियोजन करुन आपले मार्गक्रमण केले पाहिजे. एक-एक मार्काला महत्व आल्याने विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. १० वी व १२ वी परिक्षेत गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांचे यशस्वी होण्याची प्रमाण मोठे आहे, ही समाजासाठी सकारात्मक गोष्ट आहे. या गुणवंतांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न पतसंस्थेच्या माध्यमातून केला जात आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांची आर्थिक पत सुधारण्याबरोबरच त्यांच्या गुणवंत पाल्यांना शिक्षण घेतांना अडचण येऊ नये यासाठी मदतीचा हात देण्यात येतो. गुणवंत पाल्य हे पतसंस्थेचा अभिमान आहे, असे प्रतिपादन चेअरमन किरण धारक यांनी केले. पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन किरण धारक , व्हाईस चेअरमन आशा चौरे संचालक बाळासाहेब हुच्चे ,दत्तात्रय डोळसे ,निशिकांत शिंदे ,प्रसाद शिंदे ,संजय धोकरिया , मनोज क्षिरसागर , दीपक भागवत ,अभय काळे ,जालिंदर चौरे ,सागर डोळसे ,दिपक भागवत, ॲड. अमित राशिनकर ,ॲड. संदिप पडोळे, मधुरा जोशी , नंदकुमार गुरसाळे, सागर सातपुते व्यंकटेश जोशी ,कविता डोळसे ,मृणाल तिवारी,गौरव राऊत आदी उपस्थित होते. यावेळी गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्हाईस चेअरमन आशा चौरे म्हणाल्या कि पवन नागरी पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद, कर्जदार, ठेवीदार यांच्या प्रगतीसाठी विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर विविध उपक्रमातून सामाजिक दायित्वही जपले जाते. आज सभासदांच्या गुणवंत पाल्यांनी मिळविलेले यश हे कौतुकास्पद असेच आहे. त्यांचा सत्कार केल्याने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशिकांत शिंदे यांनी केले तर आभार प्रसाद शिंदे यांनी मानले.

### शिवपाणंद शेतरस्त्यांसाठी 'झिरो पेण्डसी अभियान' राबविण्याची मागणी



अहिल्यानगर- जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) कार्यालयांमध्ये शेतरस्त्यांच्या शेकडो प्रकरणांचा अंतिम निकाल महिनोनमहिने प्रलंबित असल्याने शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. या सर्व प्रकरणांवर पुढील ३० दिवसांत निर्णय न घेतल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे 'शेतकरी रस्ता हक्क आंदोलन' छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने देण्यात आला आहे.या संदर्भात चळवळीचे अध्यक्ष शरद पवळे व उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन सादर केले. या निवेदनाच्या प्रती नाशिक विभागीय आयुक्त तसेच मुंबई येथील महसूल विभागाच्या मुख्य सचिवांनाही पाठविण्यात आल्या आहेत.निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम १४३ तसेच मामलेदार कोर्ट ॲक्टच्या कलम ५/२ अंतर्गत दाखल असलेल्या शेतरस्ता प्रकरणांवर केवळ तारखांवर तारखा दिल्या जात आहेत. पीक पेरणी व काढणीच्या हंगामात शेतकऱ्यांना रस्त्याची अत्यंत आवश्यकता असताना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे शेतीची कामे अडचणीत आली आहेत.तसेच, प्रांताधिकाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या अनेक आदेशांमध्ये रस्त्याची लांबी, रुंदी, चतु:सीमा अथवा नकाशा स्पष्ट नमूद नसल्याचा आरोपही चळवळीने केला आहे. यामुळे प्रत्यक्षात रस्त्याचा ताबा देताना महसूल व पोलिस प्रशासनाला अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## भगवानगड विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे भगवान विद्यालय भगवानगड खरवंडी कासार येथे संपन्न झाला सन २००४–५ एसएससी सर्व विद्यार्थी सेवानिवृत्त शिक्षक कर्मचारी प्रसंगी उपस्थित होते प्रत्येक विद्यार्थ्याने आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले तर सेवानिवृत्त शिक्षक शिक्षिका कर्मचारी यांचा सर्व विद्यार्थ्यांचे वतीने सन्मान करण्यात आला.

काही विद्यार्थी जोडीने तर काही मुलाबाळासह कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली २००४–५ एसएससी बॅच वतीने शाळा सुधारण्यासाठी मदत करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भगवान विद्यालयाचे मुख्याध्यापक भीमराव सोनवणे होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद हुलजुते सर अनिल जवरे सर यांनी केले अनुमोदन अमोल अंदुरे सर ज्योती जगताप यांनी दिले प्रस्तावित अशोक वारे सर ग्रामपंचायत सदस्य सचिन ढोले अध्यक्ष निवड राजेंद्र खेडकर सर आभार दिपाली जायभाये मॅडम शितल अंदुरे यांनी मानले तब्बल २१ वर्षांनी २००४–५ वर्ग ग्रुप एकत्र आला होता सदर कार्यक्रमात खो–खो संगीत खुर्ची गाणी म्हणत मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा,तेरा जैसा यार कहा गाणी म्हणत हितगुज झाले फोटो सेशन झाले जुन्या आठवणींना उजाळा देत भगवान विद्यालयाचे शिक्षक डिएन शिरसाठ सर यांनी वर्गात विज्ञानाचा तास घेत हजेरी ग्रुप प्रमाणे हजेरी घेतली आनंद द्विगुणीत केला यावेळी सेवानिवृत्त शिक्षक अर्जुन आव्हाड सर पावशे मॅडम बुधवंत मॅडम गायकवाड मॅडम नारायण शिरसाट सर लक्ष्मण खेडकर सर सुरेश केळगंद्रे सर बाबासाहेब अंदुरे सर धर्मराज शिरसाट सर कुलकर्णी सर अण्णासाहेब वारे सर प्रदीप पाटील सर कोळी सर नारायण ढाकणे सर स्वामी अंगरख सचिन गायकवाड सह विद्यालयातील सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते यावेळी सरपंच तथा भगवान विद्यालयाचे शिक्षक कर्मचारी प्रदीप पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना भावी आनंदी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या यावेळी २००४ –५ विद्यार्थी ग्रुप व तिने उत्कृष्ट भोजनची व्यवस्था केली होती यावेळी भगवान विद्यालयाचे शिक्षक कर्मचारी लेखापाल अण्णासाहेब वारे सर म्हणाले

### समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग

## शेवगावच्या प्राध्यापकांना भारत सरकारचे डिझाईन पेटंट

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव येथील प्राध्यापकांनी विकसित केलेल्या ''स्मार्ट क्रॉप वॉटर ॲनालायझर'' या अभिनव प्रकल्पाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. कृषी क्षेत्रातील पाणी व्यवस्थापन अधिक प्रभावी, अचूक व तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे.

भारत सरकारच्या यांच्या वतीने या प्रकल्पाची नोंदणी डिझाईन क्रमांक ४६६८५१–००१ अंतर्गत करण्यात आली असून, दिनांक २२ जुलै २०२५ रोजी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.या प्रकल्पाचे संशोधक व निर्माते म्हणून संगणक विभागप्रमुख प्रा. महेश शहाराम मरकड, प्रा. श्रीकांत एकनाथ ढाकणे, प्रा. संदीप अर्जुन बोराळे,प्रा. ओंकार सुरेश देशमुख, प्रा. श्रद्धा सुरेश देशमुखआणि डॉ.



प्रा श्रीकांत ढाकणे | प्रा महेश मरकड | प्रा संदीप बोराळे | प्रा श्रद्धा देशमुख | प्रा ओमकार देशमुख

संगीता विलास पवार यांची नावे नोंदविण्यात आली आहेत.

''स्मार्ट क्रॉप वॉटर ॲनालायझर'' ही कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि सेन्सर तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट प्रणाली असून ती जमिनीतील आर्द्रता, , हवामान, तापमान, पर्जन्यमान तसेच पिकांच्या गरजा यांचे रिअल–टाइम विश्लेषण करून शेतकऱ्यांना अचूक सिंचन सूचना देते. या प्रणालीमुळे पाण्याचा अपव्यय कमी होऊन शाश्वत शेतीला चालना मिळणार आहे.

या प्रणालीमध्ये मृदा सेन्सर मॉड्यूल, हवामान डेटा संकलक, डिसिजन इंजिन, क्लाऊड स्टोरेज, मोबाईल ॲप आधारित इंटरफेस आणि कम्युनिकेशन मॉड्यूलचा समावेश करण्यात आला आहे. मशीन लर्निंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही प्रणाली पिकांच्या वाढीच्या टप्प्यानुसार पाण्याची गरज ओळखून सिंचनाचे वेळापत्रक तयार करते.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे, सचिव जया रहाणे, विश्वस्त हृषिकेश ढाकणे, तसेच प्रा. अंबादास डोंगरे आणि प्रा. रियाझखान अत्तार यांनी संशोधकांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातील प्राध्यापकांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केलेल्या या संशोधनाचे शैक्षणिक, कृषी व सामाजिक क्षेत्रातून सर्व स्तरांतून कौतुक होत असून, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठीही हे संशोधन प्रेरणादायी ठरत आहे. आधुनिक शेतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे भविष्यात भारतीय कृषी व्यवस्थेला नवे दिशा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचा २० मे रोजी नेवाश्यात प्रथम वर्धापन दिन सोहळा

### राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन

पोलीस पाटलांसाठी सदा एकच धोरण : न्याय्य मागण्या आणि समस्या निवारण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** गाव कामगार पोलीस पाटील संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेचा प्रथम वर्धापन दिन सोहळा आणि राज्य पदाधिकारी मेळावा बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता लक्ष्मी मंगल कार्यालय (नेवासा ते नेवासा फाटा रोडलगत, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव कोलते पाटील भूषवणार आहेत.

या सोहळ्याचे उद्घाटन विधानसभा सदस्य मा. आमदार श्री. विठ्ठलराव लंघे पाटील आणि माजी मृदा व जलसंधारण मंत्री मा. आमदार श्री. शंकरराव गडाख पाटील यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. याप्रसंगी माजी विधानसभा सदस्य मा. आमदार पांडुरंग अभंग, अहिल्यानगरचे उपविभागीय कार्यकारी दंडाधिकारी मा. श्री. सुधिर पाटील साहेब, नेवाशाचे तहसिलदार मा. श्री. संजय बिरादार साहेब आणि पोलीस निरीक्षक मा. श्री. सागर ढिकले साहेब हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस पाटलांच्या सहकार्याने, विश्वासाने आणि अथक परिश्रमाने गाव कामगार पोलीस पाटील संघटनेने आपले यशस्वी एक वर्ष पूर्ण केले आहे. या आनंददायी क्षणाचे औचित्य साधून वर्धापन दिन सोहळ्यासोबतच राज्याध्यक्ष श्री. शिवाजीराव कोलते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेची राज्य आढावा बैठकही मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरी केली जाणार आहे.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील सर्व सन्माननीय राज्य पदाधिकारी, संस्थापक सदस्य, जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्यकारिणी सदस्य, तालुकाध्यक्ष, तालुका उपाध्यक्ष, तालुका सचिव तसेच राज्यातील सर्व पोलीस पाटील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती अहिल्यानगर गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

### प्रलंबित चौपदरीकरणाविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर

## चाळीस डिग्रीच्या पुढील तापमानात डांबरी रस्त्यावर लोटांगण आंदोलन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर–पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील प्रलंबित चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे, भूधारकांना योग्य मोबदला द्यावा तसेच वारंवार होणाऱ्या अपघातांना जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, या विविध मागण्यांसाठी नारायणगव्हाण येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन बबन शेळके यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर चाळीस डिग्रीच्या पुढील तापमानात डांबरी रस्त्यावर लोटांगण आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

यावेळी शरद पवळे, शिवाजी नवले, संतोष कोहकडे, रमेश कोहकडे, रामचंद्र अवचिते, संजय साबळे, बबनराव गुंड, किरण ठुबे, बाजीराव जगदाळे, जनार्दन खोबरे, सचिन कांडेकर, गजेंद्र सरडे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नारायणगव्हाण येथील महामार्गाचे चौपदरीकरण अनेक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. वाढती वाहनसंख्या आणि अरुंद रस्ता यामुळे गाव परिसरात वारंवार अपघात होत असून शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सातत्याने छोटे–मोठे अपघात घडत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.ग्रामस्थ व सामाजिक संघटनांनी वेळोवेळी आंदोलन आणि पाठपुरावा करून प्रशासनाचे लक्ष वेधले. सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांच्या प्रयत्नांतून ९४५ मीटरपैकी ८१५ मीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले. मात्र अद्याप १२० ते १५० मीटरचे काम प्रलंबित आहे. नारायणगव्हाण गाव रस्त्याच्या मध्यभागी असल्याने ग्रामस्थांचा या मार्गावर मोठ्या प्रमाणात दळणवळणासाठी वापर होत असतो. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी उर्वरित चौपदरीकरण तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तसेच भूधारकांना योग्य मोबदला द्यावा, कामात दिरंगाई करणाऱ्या निष्क्रिय व कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि भविष्यात महामार्गावर कोणतीही दुर्घटना घडल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली

## जितो अहिल्यानगरच्यावतीने २३ मे रोजी भव्य रोजगार मेळावा

### पात्र उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीद्वारे नोकरीची संधी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या जितो जॉब्स उपक्रमांतर्गत दि.२३ मे २०२६ रोजी देशपातळीवर जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत जितो अहिल्यानगरच्यावतीने नगरमध्येही भव्य रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे. स्टेशन रोडवरील नेवासकर पेट्रोल पंपाशेजारील अर्थ बँक्वेट (४ था मजला) जीसीएम टॉवर्स येथे सकाळी ११ ते दुपारी ४ यावेळेत हा मेळावा होईल. पात्र उमेदवारांना थेट मुलाखतीद्वारे नोकरीची सुवर्णसंधी यात मिळणार आहे, अशी माहिती जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत यांनी दिली.

जितो अहिल्यानगरचे चीफ सेक्रेटरी तुषार कर्नावट व जितो जॉब्सचे कन्व्हेनर प्रशांत बोगावत यांनी सांगितले की, देशातील बेरोजगारीची समस्या लक्षात घेऊन जितोच्यावतीने सातत्याने सर्व समाजातील युवक युवतींसाठी रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या जातात. नामांकित कंपन्या आणि पात्र उमेदवार यांना एका व्यासपीठावर आणून रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जातो. या रोजगार मेळाव्यात मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, फायनान्स, बँकिंग, मार्केटिंग, प्रशासन, तांत्रिक क्षेत्र तसेच इतर विविध उद्योगांमधील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून पात्र उमेदवारांची थेट मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. सर्व रोजगार इच्छुक, फ्रेशर्स, इंटर्नशिप इच्छुक, अनुभवी प्रोफेशनल्स तसेच रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या उमेदवारांना जितो जॉब्स पोर्टलवर नोंदणी करून या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या बास्केटबॉल सराव शिबिराला खेळाडूंचा प्रतिसाद

### भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार संभाजी कदम यांचे खेळाडूंना मार्गदर्शन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने एकदिवसीय बास्केटबॉल सराव शिबिराचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार व प्रशिक्षक तसेच भारतीय सैन्यात कार्यरत असलेले संभाजी कदम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

सायंकाळी पार पडलेल्या या शिबिराला नगर शहरातील बास्केटबॉल खेळाडू व क्रीडाप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संभाजी कदम यांनी खेळाडूंना बास्केटबॉलमधील मूलभूत कौशल्ये, शारीरिक तंदुरुस्ती, खेळातील शिस्त आणि संघभावना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव कथन करत उपस्थित खेळाडूंना प्रेरणा दिली.

या कार्यक्रमास ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका सौ. कल्याणी फिरोदिया, संभाजी कदम अकॅडमीचे संस्थापक श्री. शरद नागणे, कोच गणेश नागणे व कोच धनंजय नखले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे नियोजन केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, खजिनदार सौ. रोहिणी कोतकर, प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि सौ. स्वाती बाराहाते यांनी केले. तसेच ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे प्रसाद जमदाडे, डॉ. देवेश कुमार बाराहाते, एबीसी क्रीडा मंडळाचे चंद्रशेखर म्हस्के, मुकुंद काशीद, सचिन अग्रवाल, ओमसिंग बायस, पियुष लुंकड, मार्शल पिल्ले, हर्षल शेलोत यांच्यासह अनेक क्रीडारसिक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील बास्केटबॉल खेळाला नवी चालना मिळेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असे अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांनी सांगितले.

### खरवंडी कासारसह परिसरातील

## वाडीवस्तीवर तात्काळ टँकर चालु करावेत – सुनिल खेडकर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार सह परिसरातील वाडी वस्तीवर पाणी टंचाई निर्माण झाली असून विहिरी बोरवेल कोरडे पडले आहेत माणसापेक्षा जनावरांना पाणी जास्त लागते पाणीटंचाई झाल्याने लवकरात लवकर पाणी टँकर चालू करावेत अशी मागणी पंचायत समिती पाथर्डी माजी सदस्य तथा मालेवाडीगावचे चे सरपंच सुनील खेडकर सर यांनी केली आहे.

लवकरात लवकर टँकर सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे या संदर्भात पंचायत समिती कडे पाणी टंचाई



संदर्भात लक्ष वेधले असून टँकर चालू करण्याची मागणी केली आहे ग्रामविकास अधिकारी अशोक रोकडे म्हणाले की सदर पाणी टंचाई प्रस्ताव पंचायत समितीमध्ये सादर केला आहे माणसापेक्षा पशुधनाला पाणी जास्त लागते वाडी वस्ती वर प्रथम प्रस्तावाद्वारे मागणी केली आहे.

# सीए रमेश फिरोदिया यांचा मुंबईत जेसीएएफ जीवन गौरव पुरस्काराने सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगरमधील प्रथितयश उद्योजक तथा सीए रमेश फिरोदिया यांना जैन चार्टर्ड अकाउंटंट फेडरेशनचा (जेसीएएफ) जैन सीए जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सी.ए. रमेश फिरोदिया यांना मुंबई येथे या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी जेसीएएफचे चेअरमन सीए एम.जी. भंडारी, अध्यक्ष सीए शांतीलाल कोचर, उपाध्यक्ष सीए प्रदीप कापडिया, सीए अमृत पोरवाल, सीए जयेश काला, सीए पुनित मेहता, सीए विद्युत जैन आदींसह देशभरातील जैन सीए उपस्थित होते.

संगमनेर तालुक्यातील साकूर हे फिरोदिया यांचे मूळ गाव. जीवनात प्रगती करायची तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी लहान वयात उमजले. त्यामुळे त्यांनी बी.कॉम. ऑनर्स पदवी घेतल्यानंतर सी.ए.अभ्यासक्रमास प्रवेश घेवून अतिशय कठीण अशी ही पदवी मिळवली. १९७० पासून ते एक कुशल सनदी लेखापाल म्हणून प्रॅक्टिस करीत आहेत. आपल्या व्यवसायात यशोशिखरावर पोहचतानाच फिरोदिया यांनी कायम सामाजिक बांधिलकी जपण्यावर भर दिला आहे. त्यांनी आपल्या साकुर गावात शिक्षणाची गंगोत्री आणण्यासाठी महाविद्यालय सुरु केले. साकूर येथील रमेश फिरोदिया आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स सीनियर कॉलेज संस्थेचे ते चेअरमन असून या संस्थेत आजमितीस तब्बल ८०० मुले चांगले शिक्षण घेत आहेत. मुंबईस्थित रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्टचे ते विश्वस्त आहेत. नगर जिल्ह्यात दर्जेदार आर्कीटेक्चर महाविद्यालयाची उणीव भासत होती. हे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबईला जावे लागायचे. हीच गोष्ट लक्षात घेऊन फिरोदिया यांनी नगर - सोलापूर रस्त्यावर वाळूंज शिवारात २०१७ मध्ये प्रशस्त अशा आर्कीटेक्चर महाविद्यालयाची स्थापना केली. नगरच्या आय.एम.एस. संस्थेतील सीडसी संस्थेच्या उभारणीत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. नगर शहरातील शिशु संगोपन संस्थेच्या शाळेची इमारत नव्याने बांधून देत त्यांनी सविता रमेश फिरोदिया प्रशाला हे नाव दिले. पाली राजस्थान येथील श्री रुपमुनि रजत गुरु सेवा समिती तसेच चितोडगड आदेश्वर पार्श्व सेवा ट्रस्टचे विश्वस्त म्हणूनही ते भरीव योगदान देत आहेत.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात त्यांनी नेहमीच सक्रिय योगदान दिले आहे. नगरमधील पांजरापोळ गोरक्षण संस्थेचे ते विश्वस्त व उपाध्यक्ष आहेत. याशिवाय नाशिक येथील मातोश्री वृध्दाश्रमाचेही ते विश्वस्त आहेत. धार्मिक कार्यातही त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो. नगरचे धार्मिक परीक्षा बोर्ड व मुंबईतील महावीर एज्युकेशन वसतीगृहाचे तसेच मुंबईतील आत्मा आनंद संघाचे ते विश्वस्त असून नगरमधील ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानामुळे फिरोदिया यांची अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सच्या विश्वस्तपदीही निवड झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेवून परळीतील (जि.बीड) मारवाडी युवा मंचने स्व.सुवालालजी वाकेकर (ललवाणी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ फिरोदिया यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्काराने गौरविले आहे. जितो अहमदनगरचा जितो जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळाला आहे. नगरमध्ये सी. ए. असोसिएशन भवनात प्रशस्त असे ऑडिटेरियम त्यांनी साकारले आहे. कोल्हार येथील कैवल्यधाम येथेही ते सक्रिय मदत करीत असतात. विविध क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदान लक्षात घेऊन त्यांना जेसीएएफने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचा रक्तदानाचा गौरव पुरस्काराने विशेष सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमीच्या आंदोलनात शहीद झालेले रामकुमार कोठारी व शरद कुमार कोठारी बंधूंच्या स्मरणार्थ व विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे यांच्या जन्मदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,जनकल्याण समिती संचलित जनकल्याण रक्तकेंद्र,अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम या संस्थेला रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन करून रक्तदान चळवळीत मोलाचे सहकार्य केल्याबद्दल हा बहुमान मिळाला आहे.

रक्तदान शिबीर संयोजक गौरव पुरस्कार (सन्मानचिन्ह) देऊन गौरविण्यात आले.सन्मानचिन्ह जनकल्याण समितीचे माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक

नानासाहेब जाधव,मराठा चैंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष अरविंद पारगावकर,जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री,कार्यवाह सतीश इंदानी, संचालक आदित्य चांदेकर, पुरस्कार स्वीकारताना विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,जिल्हा सह मंत्री राजेंद्र चुंबळकर,गायत्री परिवाराचे काशीनाथ मोडे,सुरेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.यावेळी विहिंपचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर म्हणाले,रक्तदान हे महान कार्य आहे. रक्तदानाच्या महान कार्याबद्दल गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आले.ही अत्यंत आनंदाची बाब आहे.विश्व हिंदू परिषदेचे सामाजिक कार्यात पुरस्काराने आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.हा पुरस्कार संस्थेच्या सर्व पाठीराख्यांना,कार्यकर्त्यांना आणि रक्तदात्यांना समर्पित केला आहे.तुमच्या साथीशिवाय हे शक्य नव्हते.हेच प्रेम आणि सहकार्य पुढेही कायम राहो, हीच अपेक्षा आहे.

# मोबाईलवर फिरणाऱ्या अंगठ्यात आलेला मेंदू वाचनातून डोक्यात नेऊन ठेवण्याचे आव्हान– लेखक शरद तांदळे

**आहिल्यानगर जिल्हा वाचनालय व्याख्यानमालेत 'व्यक्तिमत्वाची जडणघडण' व्याख्यानास प्रचंड प्रतिसाद**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मानवी संवेदना कुंठीत होत असताना मोबाईलवर दीड मिनिटाच्या रिल फिरणाऱ्या अंगठ्यात ''मेंदू ''आला आहे. वाचन, संवाद ,पुस्तके यांच्या माध्यमातून मेंदूला पुन्हा ''डोक्यात'' नेऊन ठेवण्याचे आव्हान आज समोर ठाकले असून त्यासाठी प्रत्येकाने'' डेली रीडर'' बना असे कळकळीचे आवाहन जागतिक कीर्तीचे लेखक, वक्ते शरद तांदळे यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेत ''व्यक्तिमत्त्वाची जडणघडण'' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते .यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे ,डॉ. राजा ठाकूर, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, राहुल तांबोळी, किरण आगर वाल,ग्रंथपाल अमोल इथापे ,नितीन भारताल,पल्लवी कुकडवाल आदी उपस्थित होते .

लेखक शरद तांदळे यांनी जीवनातल्या वेगवेगळ्या टप्प्याचा वाचन प्रवास त्यातील प्रेरणा प्रेरणादायी पद्धतीने सांगताना उपस्थितांना आत्मपरीक्षण करावयास भाग पाडले. ''आपण आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळे साहित्य वाचन करतो परंतु ते अत्यंत सुमार तर कधी केवळ दाखविण्यासाठी असते. अशातून अनेक अनेक जण नको त्या वयात ''बोलायला'' लागतात. त्यामध्ये सोशल मीडियावर फिरणारी खोटे मेसेज यातून होणारे ''मनभेद'' घातक आहेत. दूषित वातावरणात दुर्दैवाने महापुरुषांचे साहित्यही आता जाती जातीत वाटले जाऊ लागले आहे. यातून मेंदू खराब होण्यास सुरुवात झाली आहे. यामधून मुलांनी नेमके काय वाचायचे? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

सोशल मीडियामुळे अनेक गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. अगदी बालवयातील मुले ''चंपक'' न वाचता ''हॅरीपॉटरची'' मागणी जेव्हा करतात तेव्हा बालसाहित्यिकांसमोर नव्या पिढीला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या साहित्याची निर्मिती करणे हे मोठे आव्हान असल्याचे तांदळे म्हणाले .

व्यक्तिमत्व विकासामध्ये वाचन हा छंद नव्हे तर ती गरज आहे हे लक्षात घेतले पाहिजे .आम्ही काय वाचावे ?असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा ज्याचे ''कार्य ''आहे त्याचे साहित्य आपण वाचले पाहिजे. कारण पुस्तके ही ''बाय प्रॉडक्ट'' आहे. मोटिवेशन पुस्तकांच्या भ्रामक जगात भारतीय संस्कृतीत पैसे कमवण्याबरोबर ते दाखवणे दाखवायचे कुणाला हा प्रश्न पडत नाही कारण आम्ही सर्वांना बरोबर घेऊन चालतो. मोटिवेशनल बरोबर ''ॲक्शन आणि एक्सेप्टन्स ''या दोन गोष्टी व्यक्तिमत्व विकासात महत्त्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले.''रावण'' पुस्तकाच्या माध्यमातून मानवी सत्य अभ्यासपूर्णपने मांडल्यामुळे लोकांना आपलेसे वाटले. आपले ''समर्पण ''असेल तर आपली कोणतीही पार्श्वभूमी, परिस्थिती यशाला अडसर ठरत नाही असेही ते म्हणाले

**वसंत व्याख्यानमाला पुष्प चौथे**

# सीतेच्या गोष्टीत रमले नगरकर रसिक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सीतेच्या गोष्टीच्या वाचिक अभिनयात नगरकर रसिक रमले. निमित्त होते अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित केलेल्या वसंत व्याख्यानमालेचे.

या व्याख्यानमालाचे चौथे आणि अखेरचे पुष्प सुप्रसिद्ध लेखिका डॉ. वंदना बोकील कुलकर्णी यांनी गुंफले. वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी वाचनालयाचे सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर ,संचालिका शिल्पा रसाळ, ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी ग्रंथपाल अमोल इथापे आदी उपस्थित होते.
वंदना कुलकर्णी यांनी सुप्रसिद्ध साहित्यिका अरुणा ढेरे यांच्या सीतेची गोष्ट या कथेचे अभिवाचन वसंत व्याख्यानमाले अंतर्गत केले.



सीतेला फक्त तिचा सुखाचा चेंडू हवा होता. ज्या शिवधनुष्याचा घोडा लहानपणी आपण खेळलो तेच शिवधनुष्य पुढे रामाने मोडलं असे सीतेच्या जगण्याचे संदर्भ या कथेमध्ये होते. देवळीमध्ये सीतेने देवीच्या तांदळाच्या समोर दिवा लावला तोच तांदळा ती पुढे जाऊन विसर्जित करते. जे आपण स्थापित केलं त्याचे विसर्जन आपणच करायला पाहिजे हा विचार या कथेमध्ये मांडला आहे. मातीशी आपलं नातं घट्ट असतं .आई, बाई म्हणून माती जगण्याचं बळ देते आयुष्यात आपण विविध नात्यांनी वावरतो. कथेतल्या वसूमाईशी सीतेचं रक्ताच नातं नव्हे तर प्रेमाचं नातं आहे. वसुमाई तिची दाई असली तरी ती आईच्या मायेनं सीतेला उपदेश करते. पृथ्वी कन्या असलेली सीता ही रामाची शक्ती आहे.

वाल्मिकी रामायणामध्ये नसलेले अनेक बारीक सारिक संदर्भ सीतेची गोष्ट या अभिवाचनातून उलगडत जातात. सीता हे पात्र रामायणातलं त्या काळातले असले तरी ती कथा अरुणा ढेरे यांनी एकविसाव्या शतकामध्ये लिहिली. प्रतिभा शक्ती आणि कल्पनाविस्तार या दोन्ही गोष्टी कथेच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक असतात आणि म्हणूनच रामायणातली सीता आजही रसिकांना भावते. वंदना ताईच्या वाचिका अभिनयातून सीतेच्या आयुष्यातील विविध प्रसंग रसिकांच्या नजरेसमोर चितारले जातात. लवकुश ची माता, रामाची पत्नी वसुमाईची कन्यारूप, भरत लक्ष्मणाची वहिनी अशा नात्यांना न्याय देणारी सीता अभिवाचनातून रसिकांसमोर पोहोचवण्यात वंदनाताई यशस्वी होतात.

स्वागत डॉ. ठाकूर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख शिल्पा रसाळ यांनी करून दिली. आभार ज्योती कुलकर्णी यांनी मानले. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल,वर्षा जोशी, संकेत फाटक, आर्यन मडुर,संजय गाडेकर यांनी परिश्रम घेतले.

(पान १ वरून)

## ऑपरेशन मुस्कान अंतर्गत सतरावर्षीय मुलीचा पुण्यात शोध

शोध घेतला असता अखेर अल्पवयीन मुलगी व आरोपी हे मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन आरोपीस सदर गुन्ह्यात अटक केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील हे करीत आहेत.
सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नगर शहर विभाग डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील महिला पोलीस कॉन्स्टेबल श्वेता परमासागर, पोलीस कॉन्स्टेबल याकूब सय्यद, अमोल गाडे, दक्षिण मोबाईल सेलचे पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुंडू व नितीन शिंदे यांनी केली.

## १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या स्व. अरुणकाका साहित्य नगरीची तयारी पूर्ण

कार्यवाह जयंत येलूलकर, अभिनव खानदेश चे संपादक प्रभाकर सूर्यवंशी यांच्या शुभहस्ते पुस्तक प्रकाशन होणार आहेत. प्रारब्ध - सौ.एस.एम. मिर्झा, अंतरी - सुरेखा घोलप, माणसं असे अन तसेही - बाळासाहेब देशमुख, निशब्द भावना - विनय पिंपरकर इत्यादी पुस्तकाचे प्रकाशन यावेळी होणार आहे.

सकाळी १०/३० वा.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य कविवर्य प्रकाश होळकर यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रिताचे काव्य संमेलन होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आठव्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष कविवर्य प्रकाश घोडके, हनुमंत चांदगुडे उपस्थित राहणार आहेत.या काव्य संमेलनात बाळ पाटील, चंद्रकांत कर्डक, भास्कर निर्मळ, दशरथ शिंदे, शारदा घोडके, डॉ.कैलास दौंड, अर्जुन देशमुख, शुभांगी राऊतमारे, लक्ष्मण खेडकर, वर्षा चौबे, डॉ.स्वाती पाटील, वसंत मुरदारे, अशोक निंबाळकर, माधुरी चौधरी, डॉ.प्रवीण जाधव, प्रवीण घुले, संदीप राठोड, नागेश शेलार, स्नेहल डाडर, नवनाथ केंदळे, अनिल कुमार होळकर, रिता जाधव इत्यादी महाराष्ट्रातील कवी यामध्ये सहभागी होणार आहेत.
दुपारी २ वा. असा मी घडलो... हे चर्चासत्र बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यामध्ये पद्मश्री राहीबाई पोपेरे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी रेवणनाथ कानडे, साई एशियन हॉस्पिटलचे संचालक डॉ.सचिन पांडुळे इत्यादी सहभागी होणार आहेत.
दुपारी तीन वाजता ग्रंथविक्रेत्यामुळे वाचन चळवळीला पाठबळ मिळते का या विषयावर चर्चासत्र होणार असून यामध्ये लेखक प्रकाशक वाचक साहित्यिक ग्रंथ विक्रेते सहभागी होणार आहेत.
रविवारी दुपारी ४ वा.१७ व्या शब्दगंध संमेलनाचे पारितोषिक वितरण व समारोप अहिल्यानगर चे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार असून यावेळी माजी आमदार कविवर्य लहू कानडे, पाथर्डी नगर परिषदेचे नगराध्यक्ष अभयराव आव्हाड,सीएसआडीचे प्राचार्य डॉ. सुरेश पठारे, प्राचार्य शिवाजीराव देवढे, बापूसाहेब भोसले, कॉ. बाबा आरगडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.
या संमेलनात प्रा.डॉ.गणी पटेल, छत्रपती संभाजीनगर व आयु. अशोकराव गायकवाड, अहिल्यानगर यांना शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून मातोश्री यमुनाबाई पांडुळे स्मृती पुरस्कार ॲड रंजनाताई गवांदे यांना देण्यात येणार आहे.तसेच विविध साहित्य कृतींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.
आत्तापर्यंत झालेल्या शब्दगंध संमेलनाध्यक्षांची भाषणे '' शब्दसंचित '' या सुनील गोसावी संपादित ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.
१७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनातील सर्व कार्यक्रमांसाठी साहित्यिक व साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे,शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे,संयोजन समिती सदस्य संजय खामकर,परिमल निकम,जयंत गायकवाड, भगवान राऊत, डॉ.अशोक कानडे, भारत गाडेकर, जयश्री झरेकर, प्रा.डॉ. तुकाराम गोंदकर, राजेंद्र फंड, प्रा.डॉ. अनिल गर्जे,स्वाती ठुबे, बबनराव गिरी,सुभाष सोनवणे, हर्षल आगळे, मकरंद घोडके, शर्मिला गोसावी, राजेंद्र पवार, रवींद्र दानापुरे, प्रशांत सूर्यवंशी व राजेंद्र चोभे यांनी केले आहे.

## अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरात सुविधांचा बोजवारा

अमरधामची संरक्षक भिंत पाडून व्यावसायिक गाळे उभारून मलिदा लाटला आहे. पण अमरधाम येथे चांगल्या सुविधा देण्याकडे डोळे झाक केली जाते. महापालिकेने आधी चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देऊन नंतर कर्ज उभारणी, व्यापारी संकुल उभारणी करून काही मोजक्याच लोकांचे विशेषतः नगरसेवकांचे खिसे भरण्याचा उद्योग करावा. नगरकरांना फक्त योग्य नागरी सुविधांची गरज आहे. मनपा आयुक्त सुरूवातीपासून स्वच्छतेबाबत दक्ष असल्याचे दाखवतात. त्यांच्या स्वच्छता मोहिमेचे फोटो वर्तमानपत्रात, सोशल मीडियात दिसतात. परंतु त्यांना शहराच्या विविध भागांसह अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरातील स्वच्छतेचा विसर पडतो. हे नगरकरांचे दुर्दैव आहे. आयुक्तांनी या विषयात गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे.
शहरातील अंतर्गत रस्त्यांची डागडुजी आवश्यक
नगर शहरात मागील काही काळात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अनेक रस्त्यांचे अतिशय चांगले कॉंक्रीटीकरण झाले आहे. शहरात मजबूत रस्त्यांचे जाळे त्यांच्या विशेष प्रयत्नातून होत आहे. त्यामुळे शहराची चांगली प्रतिमा निर्माण होत आहे. विकासकामातून नगर शहराला मेट्रो सिटी करण्यासाठी आ. जगताप काम करत असून नगरकर त्यांचे स्वागतच करीत आहेत. परंतु आ.जगताप दूरदृष्टीने कामं करत असताना मनपा आयुक्त, उपायुक्त, इतर अधिकारी केवळ गलेलठ्ठ पगार घेऊन दिवस ढकलत आहेत की काय अशी परिस्थिती आहे. कारण शहरात विविध भागात अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे जैसे थे आहेत. मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या छोट्या रस्त्यांवरील खड्डे महानगर पालिका प्रशासनाने तातडीने बुजवले पाहिजे. कारण या खड्ड्यातून वाहन चालवताना अपघात होतात. मणके, पाठीचे आजार होतात. मनपाने रात्री ११ नंतर खड्डे बुजवण्याचे काम करावे म्हणजे दिवसा वाहतुकीला अडथळा होणार नाही. यासाठी विविध विभागात डिपार्टमेंटनुसार नियोजन करावे. तसेच भ्रष्ट ठेकेदारांना या कामापासून दूर ठेवावे, अशी मागणी राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.
नगरसेवकांनी निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी
महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नगरसेवकांनी विकासाची मोठमोठी आश्वासने दिली. आता या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी त्यांनी पावले उचलली पाहिजेत. केवळ पालिकेच्या व्यापारी संकुलात गाळे मिळवण्यासाठी धडपड न करता नागरी सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध होण्यासाठी नगरसेविकांनी काम केले पाहिजे. महापौर, उपमहापौरांनी मध्यंतरी पालिका मुख्यालयात हजेरी घेऊन लेट लतिफ कर्मचाऱ्यांना तंबी दिली. त्याच पद्धतीने कामचुकार आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवरही जरब बसवण्याची गरज आहे. प्रशासन प्रमुख असलेल्या आयुक्तांनी तसेच इतर उपायुक्त, अधिकाऱ्यांनी मूळ कर्तव्य न विसरता नगरकरांना चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न करावेत असे राजेंद्र चोपडा यांनी सांगितले.

## मनपा घनकचरा विभागातील अनागोंदी कारभार थांबवा

ठेवण्यात यावे, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. तसेच पत्र देण्यापूर्वी ज्या कामगारांच्या आकसाने बदल्या करण्यात आल्या आहेत, त्यांना तातडीने मूळ जागी परत पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे.
कामगार युनियनने आयुक्तांकडे केलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत - १) आकसाने केलेल्या बदल्या तात्काळ रद्द करण्यात याव्यात. २) चेंबर व गटार कामगारांना पूर्वीप्रमाणेच त्यांच्या-त्यांच्या हद्दीत कामे देण्यात यावीत. शहरातील मध्यवस्तीत अनेक ठिकाणी महापालिकेची मशिन पोहोचू शकत नाही. त्यामुळे त्या भागात अनुभवी चेंबर व गटार कामगारांची आवश्यकता आहे. अशा कामगारांच्या बदल्या करू नयेत. ३) नव्याने सुरू केलेली डेली पद्धत तात्काळ बंद करण्यात यावी. या पद्धतीमुळे कामगारांचा वेळ आणि श्रम वाया जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ४) जुन्या शहर भागात मोठ्या प्रमाणात जयंती, मिरवणुका, धार्मिक उत्सव तसेच बाजारपेठा असल्याने कचऱ्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे त्या भागात अतिरिक्त कामगारांची आवश्यकता असताना तेथील कामगार इतरत्र पाठवू नयेत. ५) घनकचरा व्यवस्थापन विभागातील सुरू असलेला अनागोंदी कारभार तात्काळ थांबविण्यात यावा.
कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर म्हणाले की, ''सफाई कामगारांवर अन्याय होत असून प्रशासनाकडून त्यांचा मानसिक छळ केला जात आहे. अपुऱ्या मनुष्यबळातून शहराची स्वच्छता राखणारे कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. मात्र त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नाही. आकसाने बदल्या करणे, अतिरिक्त कामाचा ताण देणे आणि अरेरावीची भाषा वापरणे हा प्रकार आता सहन केला जाणार नाही.
सचिव आनंद वायकर म्हणाले की, ''कामगारांच्या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे. अन्यथा २२ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून महापालिकेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल. आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.